# नवीन शैक्षणिक धोरण एक अभ्यास

**डॉ.सुजय बाबूराव पाटील,** प्राध्यापक व प्रमुख मराठी विभाग, कमला कॉलेज, कोल्हापूर, **मो.** ८४२१६६८४०६

**ई मेल**: sujaybpatil@rediffmail.com

---

**प्रस्तावना:**

२०२२-२३ हे वर्ष भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदलाचे वारे घेऊन येणारे ठरले. कारण नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी या वर्षात सुरु झाली.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची २०२० पासून अमलबजावणी सुरु झाली आहे. ३४ वर्षानंतर राबविण्यात येत असलेल्या शैक्षणिक धोरणात पारंपारिक शिक्षणात बदल करून विद्यार्थ्यांमधील क्षमता, कलात्मकता, कौशल्य याच बरोबर कृतियुक्त शिक्षणावर भर देण्यात आलेला आहे.

स्वातंत्र्यानंतर पहिले शैक्षणिक धोरण १९६८ साली त्यानंतर १९८६ रोजी दुसरे शैक्षणिक धोरण राबविण्यात आले. २०२० साली डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील नवीन शैक्षणिक धोरण लागू केले गेले. यात पारंपारिक अभ्यासक्रमात बदल केला गेला आहे. वय वर्ष ०३ ते १८ पर्यंत विद्यार्थ्यांना शालेय, उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण दिले जाणार आहे.

पहिले व दुसरीचे शिक्षण खेळातून दिले जाईल. चौथी पासून परीक्षा व कृतियुक्त शिक्षण सुरु होईल. ६ वी ते ८ वी पर्यंत व्होकेशनल शिक्षण त्यानंतर ९ वी ते १२ वी पर्यंत आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन असणारे शिक्षण दिले जाईल. पदवी पर्यंतच्या शिक्षणात मल्टिपल एंट्री व मल्टिपल एक्झिट पद्धत लागू असेल.

माध्यमिक स्तरावर कृतीवर आधारित प्रायोगिक अभ्यासक्रमाची आखणी करण्यात येणार आहे. व्यावसायिक हस्तकला व कौशल्य विकास करण्याच्या दृष्टीने शिक्षण देण्यात येणार आहे. इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेचे अवास्तव महत्त्व कमी करण्यात येईल. याचा अर्थ परीक्षा राहणार नाहीत असा नाही. उच्च माध्यमिक वर्गात कला, वाणिज्य, विज्ञान असे शाखा भेद न ठेवता आवडीचे विषय निवडता येतील. पदवी पातळीवर आवडीचे विषय निवडण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना दिल्यामुळे हे धोरण मुक्त शिक्षणाचा पुरस्कार करताना दिसते.

विद्यार्थ्यांच्या मुल्यांकनामध्ये गुणांचे महत्त्व कमी करून बहु आयामी मुल्यांकनाचा स्वीकार नवीन शैक्षणिक धोरणाने केला आहे. ज्यात स्वयंमुल्यांकन, सहाध्यायी मुल्यांकन, शिक्षण मुल्यांकनासोबत विद्यार्थ्यांचे भावात्मक, सामाजिक, बोधात्मक, क्रियात्मक प्रगतीच्या आधारे सातत्यपूर्ण मुल्यांकन करावे अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

संशोधन, आकलन, उपयोजनावर भर, गणिती वैज्ञानिक दृष्टीकोन, सर्जनशीलता, चिंतनशील विचार, सहबंधात्मक अध्ययन, संवाद कौशल्य यांना अभ्यासक्रमात स्थान देण्याच्या विचारामुळे हे शैक्षणिक धोरण आनंददायी शिक्षणाचा पुनरुच्चार करताना दिसते.

या धोरणाचा कौशल्य व व्यावसायिक शिक्षणाला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार कौशल्यविकास व व्यावसायिक शिक्षणातील विषयाची निवड करण्यात प्रोत्साहन देण्यात आल्याने विद्यार्थ्यांना याचा चांगला फायदा होईल असं म्हणावे लागेल.

नवीन शैक्षणिक धोरणाबाबतचा सर्व जमेच्या बाजू असल्या तरी काही या व्यवस्थेतील जाणकारांनी उपस्थितीत केलेल्या शंका नजरेआड करून चालणार नाहीत. त्यामुळेच डॉ. भालबा विभूते यांनी या संदर्भात आपले मत नोंदविताना म्हटले आहे की, 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' चा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. हे धोरण जाहीर करण्याची घाई का केली गेली हे शासनालाच माहित. धोरणाच्या मसुद्यात सुधारणा करण्यासाठी दोन लाखांच्या पेक्षा जास्त सूचनांचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले होते. त्यापैकी किती सूचना स्वीकारल्या किती नाकारल्या आणि का नाकारल्या याचा अहवाल प्रसिद्ध होणे गरजेचे आहे.

शासनाने खरे तर ताबडतोब कोरोनोत्तर काळातील शिक्षणाच्या रणनीती ठरविण्यासाठी आयोग नेमावा. त्या आयोगाने देशातील शिक्षणतज्ज्ञांची आणि सबंधित घटक राज्य शासनापासून पालकांपर्यंत सल्लामसलत करून आणि डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अहवालातील व्यवहार्य बाबी यांचा एकत्रित विचार करून नवीन शैक्षणिक धोरणाची आखणी करणे आजच्या घडीची गरज आहे.

तर माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे हे या संदर्भात मत नोंदविताना म्हणतात, 'नवीन शैक्षणिक धोरणात सामाजिक व आर्थिक दृष्टीकोनातून वंचित गट (एसईडीजी) समाविष्ट करण्याचे संबोधित केले आहे. त्यासाठीची कोणती

उद्दिष्टे असतील आणि ती कशी प्राप्त केली जाऊ शकतात एक चिंतेची बाब आहे. यातील बहुतेक समुदाय मुख्यत: त्यांच्यातील दूरस्थपणा, सहनसुलभता, तसेच आर्थिक अडचणीमुळे वगळले गेले आहेत.

थोडक्यात काळाची पाऊले ओळखून शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ नवीन शैक्षणिक धोरण राबविण्यासाठी जरी उत्सुक असली तरी विद्यार्थ्यांला केंद्रवर्ती ठेवून या धोरणाची अंमलबजावणी व्हावी. त्यासाठी आवश्यक त्या सुविधा निर्माण कराव्यात अशी अपेक्षा व्यक्त होत आहे ही गोष्ट नाकारून चालणार नाही.

**निष्कर्ष :**

१) नवीन शैक्षणिक धोरण ही काळाची गरज म्हणून स्वीकारावे लागेल.

२) पारंपरिक शिक्षणाबरोबरच हे धोरण व्यावसायिक कलाकौशल्यांना प्राधान्य देणारे आहे.

३) विद्यार्थ्यांना विषय निवडीत कमालीचे स्वातंत्र्य देणारे हे धोरण विद्यार्थ्यांच्यात संभ्रमावस्था निर्माण करणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

४) हे धोरण राबविताना भौतिक सुविधांचा पुरवठा व आर्थिक तरतूद यांचा ताळमेळ घालावा लागणार आहे.

५) अनेक विषयांचा पर्याय उपलब्ध करून दिल्याने तेवढे शिक्षक, मार्गदर्शक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

१) नवीन शैक्षणिक धोरणातून शिक्षणक्रांती, डॉ. सूर्यवंशी माधव.

२) नव्या धोरणाबद्दल नवे शैक्षणिक संभ्रम, डॉ. देशमुख अ.ल.

३) ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर अमृतमहोत्सव स्मरणिका.